द. सि. मा. श्री. भवरलालजी जैन (मोठे भाऊ)


किंमत ५० रूपये
वर्ष-२, अंक-२, जून २०१५

P-34-37

# ॲग्रोवर्ल्ड

ध्यास... कृषी व ग्रामविकासाचा

# जलसंधारण विशेषांक



स्पॉट रिपोर्ट
आशियायी देशांची खरिपाची तयारी

## यशोगाथा

पाण्याची समस्या सोडविणारा 'जलपुरुष'

शिरपूर पॅटर्नमुळे फुलले हिरवे स्वप्न

जलसंधारणाने शेतशिवारं 'जलयुक्त'

खारपान पट्ट्यात जलसंधारणाचे प्रयोग

कोरडवाहू शेतीला 'कांताई'चे सिंचन


पावसाचे पाणी संकलित केले, टंचाईग्रस्त गाव पाणीदार झाले!

अनिल शिंदे,
जळगाव



# कोरडवाहू शेतीला 'कांताई'चे सिंचन

**गिरणा नदीवर 'जैन इरिगेशन'तर्फे उभारलेल्या बंधाऱ्याने शेतीला जीवनदान मिळाले**



बंधाऱ्याच्या सांडव्यातून शेतीसाठी पाणी सोडले जाते.

**जळगाव येथील 'जैन इरिगेशन सिस्टिम्स'चे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी व्यवसायासोबतच सामाजिक कार्याची बांधिलकी जपली आहे. 'पाणी हेच जीवन' या उक्तीतला मथितार्थ लक्षात घेत त्यांनी सुरवातीपासून पाणी व्यवस्थापन या विषयाला गंभीरतेने घेतले आहे. कोरडवाहू शेती सिंचनाखाली यावी या उद्देशाने जळगाव तालुक्यातील नागझिरी परिसरातील गिरणा नदीवर बंधारा बांधला आहे. बंधाऱ्यात उपलब्ध झालेल्या जलसाठ्यामुळे आटलेल्या विहिरींना पाणी मिळाले असून कोरडवाहू क्षेत्र यामुळे सिंचनाखाली आले आहे. अवघ्या ९ महिने ११ दिवसात हा बंधारा साकारला असून 'कांताई' असे त्याचे नामकरण केले आहे.**

सर्वत्र दिवसेंदिवस पाण्याचा प्रश्न बिकट होत चालला आहे. या संकटामुळे अवघे कृषी क्षेत्र धोक्यात आलेले आहे. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी जागोजागी बंधारे बांधून पाणी अडविण्याशिवाय पर्याय नाही. हा मुद्दा लक्षात घेऊन 'जैन इरिगेशन सिस्टिम्स्'चे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी बंधारा बांधण्याचे ठरविले. गिरणा नदी असूनही पाण्याच्या दुर्भिक्षाला सामोरे जाणाऱ्या तसेच अवर्षणग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जळगाव तालुक्यातील नागझिरी परिसरात बंधारा बांधण्याचे निश्चित केले. जैन इरिगेशनच्या सहयोगाने तापी पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत शासनाशी करार करण्यात आला. करारानुसार यातील ५० टक्के पाणीसाठ्यावर शासनाचा अधिकार असून हे पाणी परिसरातील अल्पभूधारक, कोरडवाहू शेतकऱ्यांना मिळणार आहे. ५० टक्के पाणीसाठा जैन उद्योग समूहासाठी राखीव आहे.

## सहकाऱ्यांनी पेलली खडतर आव्हाने

भवरलालजी जैन यांनी कांताई बंधाऱ्यासाठी पाहिलेल्या स्वप्नाला प्रत्यक्षात साकार करण्यासाठी सहकाऱ्यांनी सर्वोतोपरी प्रयत्न केले. बंधाऱ्याचे काम सुरू असताना त्यांनी कामाची ठिकाणी आवर्जून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. उत्तम दर्जाबाबत कुठलीही तडजोड न करता कांताई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली आहे. बंधाऱ्याचे काम सुरू असताना अनेक समस्या उभ्या ठाकल्या. मात्र, येथे कार्यरत सहकाऱ्यांनी तेवढ्याच सहजतेने मार्ग काढला. अवघे ९ महिने ११ दिवसात कांताई बंधारा साकारला. यामुळे एवढ्या कमी कालावधीत प्रत्यक्षात कार्यान्वित होणे यातच भवरलालजींचे उत्कृष्ट व्यवस्थापन आणि

## ▶ बंधाऱ्याची वैशिष्ट्ये

- नागझिरी परिसरातील गिरणा नदीवर बांधण्यात आलेल्या या बंधाऱ्याची पाण्याची क्षमता १७९.१८ कोटी असून याचे पाणलोट क्षेत्र ९१३.६१ चौरस कि.मी. एवढे आहे.
- बंधाऱ्याची लांबी गिरणेच्या पात्राप्रमाणे २४६ मीटर एवढी असून त्याची जास्तीत जास्त उंची ८.९२ मीटर एवढी आहे. हा बंधारा पूर्ण क्षमतेने भरलेला असताना याचे बॅकवॉटर सुमारे ५.६६० मीटर पर्यंत जाते.
- बंधाऱ्याच्या भिंतीची उंची साडेचार मीटर असून ८१ दरवाजे ठेवण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी एकूण भांडवली खर्च ७ कोटी ८५ लाख ८१ हजार रुपये एवढा आला आहे.
- या बंधाऱ्यामुळे परिसरातील विहिरी, बोअरवेल्सच्या पाण्याची पातळी वाढली आहे. यामुळे साहजिकच बागायतीक्षेत्रात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नात भर पडणार आहे.

सहकाऱ्यांच्या अपार कष्टांचे दर्शन घडते.

**कृषी विकासला नवी दिशा**

शेतीशी निगडित विविध प्रकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करता यावा यादृष्टीने 'जैन इरिगेशन'ने आपल्या आधुनिक आणि उच्च प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगभर विविध प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. याचसोबत सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून अनेक अभिनव उपक्रम राबविले आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून बंधाऱ्यातील ५० टक्के पाणी जैन उद्योग समूहाला मिळणार असले, तरी या बंधाऱ्यातील पाण्यामुळे आता पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे यातील ५० टक्के पाणी या पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून भविष्यात पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पाईपलाइनच्या माध्यमातून आधुनिक शेती करण्याचा मार्गही उपलब्ध झाला आहे. आपले आर्थिक उत्पन्न वाढविण्याची सोय निर्माण झाल्याबद्दल पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या परिसरातील कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्याला वर्षाला एका एकरात जेथे दोन हजार रुपये उत्पन्न मिळणे कठीण होते, तोच शेतकरी आता या पाण्यामुळे दरवर्षी २० हजार ते लाखापर्यंत एकरी उत्पन्न काढू शकेल असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

**रस्त्यांने जोडली गावे**

गिरणा नदीच्या अलीकडच्या व पलीकडच्या काठावर गावे वसली आहेत. या गावांच्या मध्येच नदी असल्याने पावसाळ्यात गावांचा संपर्क तुटायचा. कांताई बंधाऱ्याच्या परिसरात चार रस्ते 'जैन इरिगेशन'तर्फे रस्ते तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीद्वारे शेतकरी, विद्यार्थी यांच्यासह



### ▶ कांताई बंधाऱ्यामुळे कृषी विकासाला चालना

**पाण्याच्या दुर्भिक्ष्याला सामोरे जाणाऱ्या तसेच अवर्षणग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिसराला बंधाऱ्यात उपलब्ध झालेल्या जलसाठ्यामुळे आटलेल्या विहिरींना जलस्रोत मिळाला आहे. या पाण्यामुळे परिसरातील कोरडवाहू शेतीदेखील सिंचनाखाली येणार आहे. सातत्याने भेडसावणाऱ्या पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर कांताई बंधाऱ्याच्या माध्यमातून करण्यात आलेले जलव्यवस्थापन कृषी विकासला चालना मिळणार आहे.**

**– भवरलालजी जैन,
संस्थापक अध्यक्ष, जैन इरिगेशन
सिस्टिम्स, जळगाव**

नागरिकांसाठी अत्यंत सुकर मार्ग उपलब्ध झाला आहे. तसेच जळगाव आणि एरंडोल तालुक्यातील अनेक गावांचे अंतरदेखील या रस्त्यांमुळे कमी झाले आहे.

**निसर्गाचं अद्वितीय रूप**

उंच–सखल आणि गर्द हिरव्या आमराईच्या कुशीत वसलेला कांताई बंधाऱ्याचा परिसर हिरवाईच्या गर्द दाटीने नटलेला आहे. हिरवाईच्या नवख्या आणि लोभस रूपाने आपण मोहित झालो नाहीत तर नवलच! गर्द हिरवाई अन् निसर्ग सौंदर्याने ओथंबून भरलेले हे स्थळ मनाला एक अद्भुत आणि अविस्मरणीय गारवा झोंबविल्या शिवाय राहत नाही. हिरवाई आणि स्वच्छतेचे लेणे पांघरलेल्या या स्थळाची शुद्ध हवा मनासह शरीराला सुखद गारवा देऊन आरोग्य, प्रसन्नता, निरव शांततेचे दर्शन घडवीत असते. कांताई बंधारा परिसराचे अद्वितीय रूप प्रत्यक्षात पाहिल्यानंतर निसर्ग आणि मानवाचं कसं नातं अतूट आहे याची प्रचिती येते. निसर्गसृष्टिचा विहंगम नजराणा अनुभवताना डोळ्यांचे पारणे फिटल्याशिवाय राहत नाही.

**पर्यटकांची गर्दी, रोजगार उपलब्धी**

पूर्वी पावसाळ्यात गिरणा नदीला आलेले पाणी सरळ वाहून जायचे. परंतु या नदीवर



**बंधारा उभारणीवेळी भंवरलालजी जैन यांनी मार्गदर्शक सूचना दिल्या.**

## बंधाऱ्यामुळे विहिरींच्या पातळीत वाढ



माझी शेती गिरणा नदीपासून जवळपास ४ हजार मीटर अंतरावर असून मका, गहू, कांदा ही पिके घेत असतो. हा बंधारा होण्यापूर्वी विहिरीला पाणी नसल्यामुळे मोटारपंप फक्त ५ ते ७ मिनिटे चालायचा. त्यामुळे समाधानकारक उत्पन्न मिळत नव्हते. कांताई बंधाऱ्यामुळे परिसरातील विहिरींना पाण्याचा स्रोत निर्माण झाला असल्याने विहिरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. आज जवळपास सात ते आठ तास मोटारपंप सुरू असल्यानंतरही माझ्या विहिरीच्या पाण्याची पातळी कमी होत नाही. या बंधाऱ्यामुळे बागायतीक्षेत्र तसेच उत्पन्नात वाढ होणार असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**– विलास पाटील, शेतकरी, कढोली**

## जलसाठ्याने बागायती क्षेत्रात वाढ



कांताई बंधाऱ्यापासून जवळपास २ ते ३ किलोमीटर अंतरावर माझी १४ ते १५ एकर शेती आहे. ऊस, कपाशी, मका, गहू अशी पिके मी घेत असतो. कांताई बंधाऱ्यामुळे परिसरातील विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून बंधाऱ्याचा फायदा या परिसरातील अनेक शेतकऱ्यांना होत आहे. शेतीसाठी पाणी हा मुख्य घटक असून पाणी नसल्याने बागायती शेतीदेखील पावसाच्या पाण्यावर करावी लागत होती. कांताई बंधाऱ्यामुळे समाधानकारक जलसाठा उपलब्ध झाल्याने बागायती क्षेत्रात वाढ झाली आहे.


**– प्रभाकर बडगुजर, माजी सरपंच, कढोली**

बंधारा बांधला गेल्याने परिसरातील शेतीला त्याचा मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे. याचबरोबर या बंधाऱ्यामुळे मासेमारी व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार तयार झाला आहे. मनाला भुरळ घालणाऱ्या अशा या प्रेक्षणीय स्थळाची साक्षात अनुभूती घेणाऱ्यांसाठी विविध ठिकाणांहून पर्यटकांची गर्दी वाढत असून या नयनरम्य स्थळाचा मनसोक्त आनंद घेत असतात.

**मंत्र्यांनी केले कामाचे कौतूक**

'जैन इरिगेशन सिस्टिम्स'च्या आर्थिक सहयोगाने तापी जळगाव पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत बांधण्यात आलेल्या कांताई बंधाऱ्याचे उद्घाटन तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते म्हणाले की, 'कांताई बंधारा' हा भरवलालजी यांच्या कर्तृत्वातला आणखी एक मानबिंदू ठरणार आहे. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) वर आधारित राज्यातील हा पहिलाच प्रकल्प आहे. कमी पाण्याचा वापर करून कशा प्रकारे आधुनिक पद्धतीने शेती करता येईल आणि शेतकरी समाधानी कसा होईल, असे घडवून आणण्याचे व्रत भाऊंनी घेतलेले आहे. निसर्गाकडून पावसाच्या माध्यमातून पडणारे पाणी हे बहुमोल आहे. पावसाचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी योग्य व्यवस्थापनाची गरज असून हा प्रश्न नेटक्या

सांडव्यातील पाण्यावर मत्सव्यवसाय केला जातो.



## बंधाऱ्यामुळे शेतीला जीवदान मिळाले



कांताई बंधाऱ्यापासून जवळपास ३ किलोमीटर अंतरावर माझी १८ एकर शेती आहे. यात केळी, कांदा पिकांचे उत्पादन मी घेतो. बंधारा होण्यापूर्वी विहिरीला पाणी नसल्यामुळे केळीच्या बागा अक्षरशः वाळल्या होत्या. उत्पादनासाठी शेतीत टाकलेले भांडवल, श्रम वाया जाऊन उत्पादन शून्य आल्याने फार मोठा आर्थिक फटका बसला होता. भवरलालजींनी गिरणा नदीवर कांताई बंधारा बांधल्यामुळे या नदीच्या आजूबाजूच्या तसेच परिसरातील आम्हा शेतकऱ्यांना त्याचा फार मोठा फायदा झाला आहे. या बंधाऱ्यामुळे बागायत क्षेत्रदेखील वाढले असून शेतीला जीवदान मिळाले आहे.

**– पुंजू मराठे, शेतकरी, धानोरा**


## शेतीसाठीचा पाणी प्रश्न मिटला

कांताई बंधारा होण्यापूर्वी पाण्याचा फार मोठा गंभीर प्रश्न निर्माण व्हायचा. यामुळे पूर्वी आमचे बागायती क्षेत्र समाधानकारक नव्हते. त्यामुळे साहजिकच उत्पादनात घट येऊन आर्थिक समीकरण विस्कटायचे. गिरणा नदीकाठापासून साधारणतः अर्धा ते पाऊण किलोमीटरवर आमची शेती आहे. केळी, कापूस, कांदा, मका अशी पिके आम्ही घेत असतो. कांताई बंधाऱ्यामुळे विहिरींना समाधानकारक पाणी आहे. त्यामुळे आमचे बागायती क्षेत्रदेखील वाढले आहे. कांताई बंधाऱ्याच्या माध्यमातून शेतीसाठीचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

**– किशोर सोनवणे, शेतकरी, खेडी कढोली**

पद्धतीने कसा सोडविता येऊ शकतो याचे आदर्श उदाहरण म्हणून कांताई बंधाऱ्याकडे पाहता येईलफ अशा शब्दात त्यांनी जैन इरिगेशनच्या कार्याचा गौरव केला होता. तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनील तटकरे याप्रसंगी म्हटले की, 'निसर्गाचा समतोल ढासळला की आव्हाने वाढतात. ही आव्हाने पाण्याशी जेव्हा संबंधित असतात तेव्हा शेतकरी भरडला जातो. अशा स्थितीत कांताई बंधारा केवळ ९ महिने ११ दिवसात पूर्ण झाल्यामुळे स्वाभाविकच सिंचनाच्या आमच्याही अपेक्षा वाढल्या आहेत. अडचणींवर मात करणे ही जैन इरिगेशनची खासियत असून यातूनच त्यांनी जागतिक गुणवत्ता साध्य केली आहे. खरेतर राज्य सरकारतर्फे आदरणीय भाऊंचे आणि त्यांच्या परिवाराचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच राहतील. सामाजिक क्षेत्रात, कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाची एक वेगळी भर त्यांनी आपल्या कर्तृत्वातून घातली आहे. ठिबक सिंचनाचा वापर करण्याच्या दृष्टिकोनातून एका बाजूला पाण्याची बचत आणि मग उत्पादनातली भरघोस वाढ, हे साध्य करून दाखविले आहे. अडचणींवर मात करून हा बंधारा साकारल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे देखील त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले होत'.

**(लेखक हे जळगाव येथील जैन इरिगेशन सिस्टिम्स येथे जनसंपर्क विभागात कार्यरत आहेत)**



'जैन इरिगेशन'तर्फे बांधण्यात आलेल्या कांताई बंधाऱ्याचे विहंगम दृश्य